प्रेसनोट

जा.क्र. १६२ /माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस उप अधिक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक :– २/०४/२०१८

## "पत्नीस जाळुन खुन करणाऱ्या आरोपीस आजन्म सश्रम कारावास व द्रव्यदंडाची शिक्षा"

पोलीस ठाणे तुमसर अंतर्गत ग्राम येरली येथिल आरोपी नामे गोपीचंद मंगर खरवडे, वय ४० वर्ष, रा. येरली ता. तुमसर, जिल्हा भंडारा यास स्वत:चे पत्नीचे अंगावर मातीचे तेल टाकुन जाळुन खुन केल्याचे आरोप सिध्द झाल्याने आज दिनांक २.०४.२०१८ रोजी जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा चे प्रमुख सत्र न्यायाधिश श्री. संजय आ. देशमुख सा. यांनी आरोपीस आजन्म सश्रम कारावास व ३०००/– रूपये द्रव्यंडाची शिक्षा सुनावली.

याबाबत अधिक माहिती अशी की, दिनांक २६.०६.२०१३ ला तक्रारदार श्री. रतन शालीकराम राउत, वय ३२ वर्ष रा. तुमसर यांनी पोलीस ठाणे तुमसर येथे तक्रार दिली की, बहीन लक्ष्मी हिचे सन २०१२ मध्ये आरोपी गोपीचंद खरवडे याचे सोबत विवाह झाला होता. विवाहानंतर आरोपी गोपीचंद हा बहिन लक्ष्मी हिस छोटया छोटया कारणावरून वाद करून मारपीठ करीत होता व तिला शारिरीक व मानसिक त्रास देत असल्याचे तक्रारदार यास बहिन लक्ष्मी हिने वारंवार सांगीतले होते. दिनांक २६.०६.२०१३ चे दुपारी ४.३० वा. दरम्यान तक्रारदार तुमसर बाजारात असतांना फोनद्वारे माहिती मिळाली की, बहिन लक्ष्मी हिचे अंगावर आरोपी गोपीचंद खरवडे याने मातीचे तेल टाकुन माचीसचे काडीने आग लावुन जाळुन मारण्याचा प्रयत्न केला आहे व उपचारा करीता सरकारी दवाखाना तुमसर येथे नेण्यात आले आहे. सदर माहितीवरून सरकारी दवाखाना तुमसर येथे गेला असता बहिन लक्ष्मी हि जळालेल्या अवस्थेत दिसली, तिला त्याबाबत विचारपुस केली असता आरोपी पती नामे गोपीचंद खरवडे याने स्वयंपाक घरात अंगावर मातीचे तेल टाकुन माचीसची काडी लावुन जाळले असल्यायचे सांगीतले पुढील उपचारा करीता लक्ष्मी हिस सामान्य रूग्नालय, भंडारा येथे हलविले असल्याचे सांगीतले. लक्ष्मी हिचे वैद्यकीय उपचार सुरू असता सायंकाळी ७.३० वा. मरण पावली. अशा खबरेवरून आरोपी विरूध्द अपराध क्र. ८४/१३ कलम ४९८(अ), ३०७, ३०२ भादवि अन्वये गुन्हा नोंद केला.

सदर गुन्हयाचा तपास सहा. पोलीस निरीक्षक, अशोककुमार तिवारी यांनी करून गुन्हयातील **आरोपी नामे गोपीचंद मंगर खरवडे, वय ४० वर्ष, रा. येरली ता. तुमसर, जिल्हा भंडारा यास** अटक करून गुन्हयाचा तपास केला. तपासात आरोपी विरूध्द पुरावे प्राप्त झाल्याने आरोपी विरूध्द गुन्हयात कलम ४९८(अ), ३०७, ३०२ भादवि अन्वये आरोप पत्र तयार करून सत्र न्यायालय, भंडारा येथे दाखल केले. सदर आरोपपत्रास केस क्र. ५४/१३ अन्यवे प्रमुख न्यायाधिश सा. यांचे समक्ष सुनावणी करीता ठेवण्यात आले.

सदर गुन्हयाची सुनावणी **मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश श्री. संजय आ. देशमुख सा.** यांचे समक्ष चालली गुन्हयात सरकार पक्षातर्फे **ॲडव्होकेट दुर्गा तलमले, सहा. सरकारी अभियोक्ता**, सत्र न्यायालय भंडारा यांनी योग्य बाजु मांडुन साक्षदार तपासले. आज दिनांक २.०४.२०१८ रोजी गुन्हयाचे स्वरूप व गंभिरता लक्षात घेवुन **आरोपी नामे गोपीचंद मंगर खरवडे, वय ४० वर्ष, रा. येरली ता. तुमसर, जिल्हा भंडारा** यांचे विरूध्द दोषसिध्द झाल्याने **कलम ४९८(अ) भादवि अन्वये एक वर्षे सश्रम कारावास व ५००/— रूपये दंड, व कलम ३०२ भादवि अन्वये आजन्म सश्रम कारावास व २५००/— रूपये दंड अशी शिक्षा सुनावण्यात आली.** सदर गुन्हयात पोलीस निरीक्षक, गजानन कंकाळे, ठाणेदार पोलीस ठाणे तुमसर यांचे मार्गदर्शनात पोलीस नाईक, यशवंत हलमारे पो.स्टे. तुमसर यांनी योग्य पैरवी अधिकारी म्हणुन कामकाज केले.

**महाराष्ट्र पोलीस दल, जिल्हा भंडारा तसेच सरकारी अभियोक्ता वर्ग जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा तर्फे जनतेस निर्भीड पणे गुन्हयाचे दोषसिध्दी करीता व महिलांवरील अत्याचार रोखण्याकरीता पोलीसांना पंच व साक्षदार म्हणुन सहकार्य करण्याचे जाहिर आवाहन करण्यात येत आहे.**

(एस. आर. तेलुरे)
जि.वि.शा.भंडारा
दुरध्वनी क्र.९९२१२५३५४९

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत:** संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.